मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# थकबाकी भरली नाही तर महागड्या वस्तू होणार जप्त

## पिंपरी-चिंचवड शहरात 310 कोटींचा थकीत कर : शहरात एकदाही कर न भरलेले 34 हजार 22 मालमत्ताधारक

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील थकबाकीदार असलेल्या १ लाख १२ हजार ८०९ निवासी मालमत्ताधारकांकडे ३१० कोटींचा थकीत कर आहे. ज्या निवासी मालमत्ताधारकांकडे ५ किंवा १० वर्षांपेक्षा अधिक काळापासून थकबाकी आहे, अशा निवासी मालमत्तांची जंगम मालमत्ता म्हणजे कार, टीव्ही, फ्रिज व घरातील महागड्या वस्तू जप्त करण्याची कारवाई महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून करण्यात येणार आहे.

शहरात ज्या निवासी किंवा बिगरनिवासी मालमत्ताधारकांकडे थकबाकी आहे, अशा मालमत्ताधारकांवर महापालिका कठोर कारवाई करण्यास सुरुवात करणार आहे. शहरात ७ लाख ३१ हजार मिळकतींची नोंद आहे. त्यापैकी आतापर्यंत ४ लाख २६ हजार मालमत्ताधारकांनी चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा केला आहे. तसेच, आतापर्यंत एकदाही मालमत्ता कर न भरलेली ३४ हजार २२ इतकी संख्या असून, अशा मालमत्ताधारकांवर महापालिका कठोर कारवाईस सुरुवात करणार आहे.

१ लाख १२ हजार ८०९ निवासी मालमत्ताधारकांकडे ३१० कोटींचा थकीत कर आहे. महापालिकेने पहिल्या तिमाहीत ५२२ कोटींचे कर वसूल करून विक्रम केला आहे. चालू आर्थिक वर्षात कर संकलन विभागाने १३०० कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी महापालिकेच्या १८ विभागीय कार्यालयांमार्फत कर संकलनाचे कामकाज सुरू आहे. ज्या निवासी मालमत्ताधारकांकडे ५ किंवा १० वर्षांपेक्षा अधिक काळापासून थकबाकी आहे.




### ऑनलाइन मालमत्ता कर भरा, 4 टक्के सवलत

» पिंपरी चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ याकाळात ऑनलाइन भरल्यास मालमत्ताधारकांना सामान्य करावर ४ टक्के सवलत मिळणार आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तात्काळ तो भरून या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

> "पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन मोहिमेस नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. मात्र अद्यापही काही मालमत्ताधारकांनी एकदाही मालमत्ता कर भरलेला नाही. अशा थकबाकीदारांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. ५ किंवा १० वर्षांपेक्षा अधिक काळ थकबाकी असलेल्या मालमत्तांधारकांवर कारवाई सुरू करण्यात येणार आहे. मालमत्ता कर न भरल्यास मालमत्ताही जप्ती करण्याची कारवाई अटळ आहे.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

> "पिंपरी चिंचवड महापालिकेने चालू आर्थिक वर्षासाठी १३०० कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी विभागीय कार्यालयांमार्फत युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांनी ऑनलाइन कर भरणा करून ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा. मोबाईलवरून सहज कर भरता येतो, त्यामुळे प्रत्येकाने आपला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी मालमत्ता बिलाशी जोडावा, जेणेकरून सर्व सुविधा घरबसल्या मिळू शकतील."
>
> - अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# एफडीएकडून केवळ नोटीसबाजी; नमुना अहवालासाठी होतोय उशीर

## प्रत्यक्षात नमुन्याचा अहवाल येण्यास विलंब होत असल्याने एफडीएकडून कारवाई केवळ कागदावर होत असल्याचे दिसून येते

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरात अन्नपदार्थ, मिठाई आणि औषधांवर देखरेख ठेवण्याचे काम एफडीए अर्थात अन्न व औषध प्रशासनाचे असते. त्याअनुषंगाने तपासणी, चाचणी आणि प्रत्यक्ष पाहणी करण्यात येते. या तपासणीत भेसळ, त्रुटी अथवा नियमांचे उल्लंघन केले असल्याचे आढळून आल्यास कारवाई केली जाते; मात्र प्रत्यक्षात नमुन्याचा अहवाल येण्यास विलंब होत असल्याने एफडीएकडून कारवाई केवळ कागदावर होत असल्याचे दिसून येते.

ढाबे, तसेच हॉटेल संख्या वाढत आहे. हॉटेल व्यावसायिकांवर अन्न व औषध प्रशासनाची जुजबी कारवाई होते. पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील हॉटेल आस्थापना, तसेच अन्नपदार्थ विक्रेते आणि अन्न भेसळ करणाऱ्यांकडे दुर्लक्ष होत आहे. अपुरे कर्मचारी संख्या आणि तपासणीत होणारी टाळाटाळ यामुळे भेसळ करणाऱ्यांचे फावत असल्याचे दिसून येते. २०११ पर्यंत अन्न भेसळ करणाऱ्यांवर महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत केली जात होती. महापालिका क्षेत्रातील अन्न भेसळप्रकरणी तक्रार येताच, काही वेळातच अन्न पर्यवेक्षक आणि त्यांचे पथक घटनास्थळी पोहोचत असे. अन्नसुरक्षा व मानके कायदा अस्तित्वात आल्यानंतर महापालिकेच्या वैद्यकीय विभागातील अन्न पर्यवेक्षक, अन्न निरीक्षक पदावरील कर्मचारी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पुणे कार्यालयाच्या अखत्यारीत काम करू लागले.

जिल्ह्यातील मिठाईची दुकाने, हॉटेल, खानावळ आणि कच्चा माल, किराणा दुकानांची तपासणी करण्याचे अधिकार एफडीए प्रशासनाला आहेत. या माध्यमातून होणारी भेसळ, मुदबाह्य वस्तूवर आळा बसतो. तपासणीनंतर असा काही प्रकार आढळल्यास नोटीस देण्यात येते. तसेच, त्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात येतात. त्याचा अहवाल आल्यानंतर कारवाई होते.



> दुकाने, आस्थापनांची दैनंदिन तपासणी सुरू आहे. त्याबाबत अधिकारी, कर्मचारी यांना सूचना दिल्या आहेत. तसेच, नागरिकांच्या तक्रारीही येतात. भेसळ अथवा काही त्रुटी आढळल्यास एफडीएकडे तक्रार करावी. संबंधितांवर निश्चित कारवाई केली जाईल.
>
> - सुरेश अन्नपुरे, सह आयुक्त, पुणे

# कचरा संकलनासाठी आता पालिका राबवणार 'इंदूर पॅटर्न'

## परिमंडळ एकमध्ये पथदर्शी प्रकल्प, इंदूरच्या सल्लागाराची करणार नियुक्ती, कचरा यंत्राच्या मदतीने गोळा करण्याला प्राधान्य

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिका आयुक्तांनी शहर स्वच्छ करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार यंत्रणा कामाला लागली आहे. रात्रपाळीत ४० टक्के स्वच्छता कामगार काम करत आहेत. त्यामुळे शहर स्वच्छ दिसू लागले आहे. परंतु, काही अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळेच आता शहरात कचरा संकलनासाठी इंदूर पॅटर्न राबवण्यात येणार आहे.

घरांमधून कचरा गोळा केल्यानंतर तो वाहनांच्या मदतीने थेट प्रक्रियेसाठी पाठवला जाणार आहे. कचरा फीडर पॉइंट बंद करण्यासाठी हे पाऊल उचलले जात आहे. त्यामुळे पुणे महापालिकेने इंदूर येथील सल्लागाराची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. हा पॅटर्न शहरातील परिमंडळ एकमध्ये पायलट प्रोजेक्ट म्हणून राबवला जाणार आहे.

शहरात महापालिका आणि स्वच्छ संस्थेचे ३,७०० कर्मचारी ४० लाखांहून अधिक लोकांच्या घरातून कचरा गोळा करतात. शहरातील विविध सोसायट्यांमधून कचरा गोळा केल्यानंतर तो कचरा फीडर पॉइंटवर आणला जातो. तिथे ते वाहनांमध्ये भरले जाते. शहरात असे अनेक फीडर पॉइंट्स आहेत, जे कचराकुंड्या बनले आहेत. दिवसभर अनेक फीडर पॉइंट्सवर कचरा पडून आहे. त्याच वेळी, रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जातो. प्रशासन यावर कायमस्वरूपी उपाय शोधण्याचा विचार करत आहे. येत्या काळात शहरातील फीडर पॉइंट्स काढून टाकून कचरा यांत्रिकरित्या गोळा करून तो थेट कचरा प्रक्रिया केंद्रांमध्ये पाठविण्याची योजना आखली जात आहे.

शहरातील कचऱ्याच्या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. अनेक भागात रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग दिसतात. पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी स्वतः शहराची पाहणी केली आणि शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर असल्याचे सांगितले. तसेच, फीडर पॉइंट्स बंद केले जातील, असेही त्यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत, शहरात स्वच्छतेसाठी आता इंदूर पॅटर्न लागू केला जाणार आहे. यासाठी इंदूर येथील सल्लागाराची नियुक्ती केली जाईल. त्यानंतर हा पॅटर्न महापालिकेच्या परिमंडळ एकमध्ये लागू केला जाणार आहे. परिमंडळ एकमध्ये ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालय, येरवडा, कळस, धानोरी क्षेत्रीय कार्यालय आणि नगर रोड क्षेत्रीय कार्यालय यांचा समावेश आहे. या भागात कचरा संकलनाची ही नवीन योजना राबवली जाणार आहे.




### आयुक्तांना आढळल्या अनेक त्रुटी

» महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी शहराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले आहे. त्यांच्याकडून शहरातील विविध भागांना भेट देऊन पाहणी केली जात आहे. शहरातील कचऱ्याची समस्या गंभीर असल्याचे त्यांना आढळले. कचरा गोळा करण्याच्या पद्धतीपासून ते प्रक्रिया केंद्रात पाठवण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया त्यांनी समजून घेतली. त्यात त्यांना अनेक चुका आढळल्या. सफाई कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणारे कोणी नाही. अनेक ठिकाणी कर्मचारी कोणतेही काम करत नाहीत. फीडर पॉइंट्सवरून दररोज कचरा उचलला जात नसल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे हा कचरा गोळा करून तो थेट प्रक्रिया केंद्रात पाठवण्यासाठी एक नवीन प्रणाली तयार केली जाईल, असे आयुक्त नवलकिशोर राम यांनी सांगितले होते. त्यानुसार, प्रशासन कचरा यांत्रिक पद्धतीने गोळा करून थेट प्रक्रिया केंद्रात पाठवण्याचा विचार करत आहे. यामुळे फीडर पॉइंट्सची गरज कमी होईल आणि कचरा एकाच ठिकाणी साचणार नाही, असे आयुक्त नवलकिशोर राम यांनी सांगितले.

> शहरात स्वच्छता कर्मचारी दोन शिफ्टमध्ये काम करत आहेत. कचरा उचलल्यानंतर तो फीडर पॉईंटवर जात होता. परंतु आता फीडर पॉईंट बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आयुक्तांच्या सूचनेनुसार विविध उपाययोजना केल्या जात आहेत. आता इंदूरच्या धर्तीवर परिमंडळ एकमध्ये पायलट प्रोजेक्ट राबविला जाणार आहे.
>
> - संदीप कदम, प्रमुख, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पुणे महापालिका

# पुणे महापालिका नदीकाठ सुधारणा वेळेत पूर्ण करणार

## संगमवाडी ते बंडगार्डन मार्गाचे 80 टक्के तर बंडगार्डन ते मुंढवा मार्गाचे 35 टक्के काम मार्गी

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातून वाहणाऱ्या नद्यांचे काठ चांगले आणि उपयुक्त बनवण्यासाठी, पुणे महापालिकेने नदीकाठ सुधारणा प्रकल्पाचे (रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट प्रोजेक्ट) काम सुरू केले आहे. हा प्रकल्प वेगवेगळ्या टप्प्यात केला जात आहे. यापैकी एक टप्पा महापालिकेकडून बांधण्यात येत आहे. इतर रस्त्यांचे काम पीपीपी तत्त्वावर केले जात आहे. या प्रकल्पाचे काम ठरविलेल्या वेळेत पूर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. यापैकी संगमवाडी ते बंडगार्डन या मार्गाचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे, तर बंडगार्डन ते मुंढवा या मार्गाचे ३५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

गुजरातमधील अहमदाबाद येथील साबरमती नदीच्या धर्तीवर, पुण्यातही नदीकाठ सुधारणा प्रकल्प राबविला जात आहे. याअंतर्गत, मुठा आणि मुळा नद्यांच्या काठाचे सुशोभीकरण आणि विकासित केले जात आहे, जेणेकरून नागरिकांना फिरण्यासाठी याचा वापर करता येईल. नदीकाठावर दगडी उतार बनवून स्थानिक झाडेदेखील लावली जात आहेत. हे काम चांगल्या पद्धतीने होत असल्याने, संपूर्ण नदी परिसर सुंदर दिसू लागला आहे.

या प्रकल्पाचा बंड गार्डन ते मुंढवा हा भाग क्रमांक १० आणि ११ आहे. त्याची लांबी ५.७ किलोमीटर आहे. या रस्त्याचे काम महापालिका पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) द्वारे करत आहे. या मार्गाचे आतापर्यंत ३५ टक्के काम पूर्ण झाले आहे. गेल्या महिन्यात, महापालिकेने वन विभागाची जागा घेतली आहे. त्यामुळे आता कामाला गती मिळू शकेल. या टप्प्यासाठी एकूण ४६२ कोटी रुपये खर्चाचा अंदाज आहे. आतापर्यंत १९६ कोटी रुपये खर्च झाले आहेत. या टप्प्याचा पूर्ण कालावधी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत आहे.



### 31 डिसेंबरची मुदत

» हा नदीकाठ विकास प्रकल्पाच्या संगमवाडी ते बंडगार्डनपर्यंतचा पट्टा क्रमांक ९ आहे. हे ३.७ किलोमीटर लांबीचे क्षेत्र आहे. हे काम महापालिका स्वतः करत आहे. या कामासाठी ३०५ कोटी रुपयांचा अंदाज वर्तवण्यात आला होता. प्रत्यक्ष कंत्राटदाराने २६५ कोटी रुपयांना काम करण्याची तयारी दर्शविली होती. या मार्गाचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. अंदाजे २३३ कोटी रुपये खर्च झाले आहेत. हे काम पूर्ण करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ ही मुदत देण्यात आली आहे. हे काम दिलेल्या वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### जनहित याचिकेनंतर झाडांची पुनर्लागवड

» या प्रकल्पाविरुद्ध काही नागरिकांनी न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्यानंतर, महापालिका प्रशासनाने पुनर्लागवड आणि नवीन झाडे लावण्याचा सविस्तर अहवाल सादर केला आहे. या अहवालात झाडांच्या छायाचित्रांसह, झाडांचे अक्षांश आणि रेखांशदेखील दिले आहेत. पहिल्या टप्प्यात ५ हजार १०० झाडे लावण्यात आली, तर दुसऱ्या टप्प्यात २ हजार ३६९ झाडे महापालिकेने लावली आहेत. महापालिकेने आतापर्यंत एकूण ७,४६९ झाडे लावली आहेत आणि त्यांची काळजीदेखील घेतली जात आहे.

# तळेगाव परिसरातील वाहतूक कोंडी सोडविणेस प्रशासन अपयशी

## तळेगाव दाभाडे येथे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस भेडसावत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे येथे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस भेडसावत आहे.ही समस्या सोडविणेसाठी प्रशासन अपयशी ठरत आहे. तळेगाव स्टेशन भागातील रेल्वे लोहमार्गावरील पूल अरुंद आहे.

त्या पुलाचे शेजारीच जो जूना पूल धोकादायक असल्यामुळे अनेक वर्षांपासून बंद आहे त्या पुलाची दुरुस्ती करुन वापरात आणावा आणि मुंबईच्या दिशेने जाणारी वाहने त्या पुलावरुन सोडावीत आणि मुंबईच्या दिशेने येणारी सध्याच्या पूलावरुन सोडावीत म्हणजे तेथे वाहतूक कोंडीस थोडाफार आळा बसेल.

तसेच तळेगाव रेल्वे स्टेशन कडे स्टेशन चौकातून जाणारे आणि यशवंत नगर कडून स्टेशन कडे जाणारे रस्ते अरुंद असून रोडवर खड्डे आहेत, रिक्षा स्टँड नाही यामुळे स्टेशन चौकात



आणि जनरल हॉस्पिटल गेट समोर वाहतूक तुंबते. यामुळेही वाहतूक कोंडी होते. पुणे येथून लोणावळ्याकडे जाणाऱ्या आणि लोणावळ्याकडून पुणेकडे जाणाऱ्या तसेच पुणे-तळेगाव -पुणे अशा सुमारे ३६ लोकल फेऱ्यांची ये-जा चालू असते तसेच अनेक लांब पल्यांच्या रेल्वेचा थांबा तळेगाव स्टेशन येथे आहे.

आणि या रेल्वे आणि रेल्वे लोकल मधून प्रवाशी तळेगाव स्टेशन येथे उतरणे आणि बसणे सतत चालु असते प्रवाशांना सोडायला आणि न्यायला येणारी वाहने, पादचारी यामुळे अरुंद रस्ता यामुळे रोडवर वर्दळ होते यामुळे आणखी अडचणी येतात यामुळेही वाहतूक कोंडी होते स्टेशन कडे जाणाऱ्या रस्त्यावर फुटपाथ असणे, रिक्षा स्टँड असणे आवश्यक आहे.तसेच या रोडवरील अतिक्रमणे हटवणे आवश्यक आहे.

लोकल मधून प्रवाशी उतरतात आणि लोकलमध्ये बसतात त्यांची वाहने ये-जा करणारी वाहने त्यात अरुंद रस्ते त्यावरील खड्डे ,पादचा-यांना चालण्यासाठी फुटपाथ नाहीत,तसेच तळेगाव-चाकण रोडवर भाजी वाल्यांची,फळविक्रेत्यांची अतिक्रमणे आहेत भाजी,फळे खरेदी करणा-यांची वाहने रोडवरच कडेला लावली जातात यामुळेही वाहतूक कोंडीत भर पडते. कधी कधी वाहतूक कोंडी एवढी असते की काही वाहणे रस्त्याच्या खाली उतरावी लागतात. या बाबींचा प्रशासनाने विचार करावा. अशी वाहन चालकांची आणि नागरिकांची मागणी

> तळेगाव-चाकण महामार्गावर नगर,नाशिक,बीड,संभाजी नगर आदी भागातून मुंबईच्या दिशेने जाणारी-येणारी वाहने मोठ्या प्रमाणात असतात.तरी तळेगाव मधील वाहतूक कोंडी सोडविणे आवश्यक आहे.
>
> - चंद्रकांत सावंत सामाजिक कार्यकर्ते.तळेगाव.

> कर्मचाऱ्यांची कामाची ड्युटी ८ तासांची असते परंतु वाहतूक कोंडीमुळे घरातून निघून परत येईपर्यंत १५तास लागतात यामुळे मनस्ताप होतो.असा त्रास रोज सहन करावा लागतो.
>
> - कैलास मालपोटे तळेगाव एमआयडीसी कामगार

> सतत पडणारा पाऊस अरुंद रस्ते त्यावरील खड्डे,प्रत्येकांना इच्छित स्थळी जाण्याची घाई यामुळेही वाहतूक कोंडीत भर पडते तरी नागरिकांनी वाहतूकीचे नियम पाळून सहकार्य करावे.
>
> - गणेश लोंढे सहाय्यक वाहतूक पोलीस निरीक्षक वाहतूक

# आगामी महापालिका निवडणुकीसाठी मोर्चे बांधणीस वेग

## दोन प्रमुख पक्षात निवडणूक घमासान रंगण्याची शक्यता राजकीय जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक तब्बल साडेआठ वर्षांनंतर होत आहे. त्यासाठी महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) हे दोन पक्ष आमनेसामने आल्याचे दिसत आहे. त्या दोन प्रमुख पक्षात निवडणूक घमासान रंगण्याची शक्यता राजकीय जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे महापालिकेच्या निवडणुका घेण्यात येत आहेत. शहरातील चार सदस्यीय 32 प्रभागांची रचना महापालिकेने तयार केली आहे. लवकरच तो आराखडा नगर विकास विभाग आणि तेथून राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविली जाणार आहे.

ऑगस्टमध्ये 22 तारखेला प्रारूप प्रभागरचना जाहीर केली जाईल.त्यावर सुनावणी झाल्यानंतर प्रभागरचना अंतिम होईल. त्यानंतर



### महापालिकेवर आपलाच झेंडा फडकला पाहिजे

» काहीही करा, पिंपरी-चिंचवड महापालिकेवर आपलाच झेंडा फडकला पाहिजे, असे आदेश भाजपा तसेच, राष्ट्रवादी काँगेसला स्थानिक पदाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. कामाला लागा. जिंकणाऱ्या सक्षम इच्छुकांनाच उमेदवारी द्या. झपाटून कामाला लागा. आपल्या प्रभागातील प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचा. राज्य सरकाराने केलेली कामे, योजना, धोरणे मतदारांपर्यंत पोहचवा. शहरासाठी नेत्यांनी केलेली कामे आवर्जून सांगा, असे आदेश देण्यात आले आहेत. त्यादृष्टीने स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून मोर्चेबांधणी केली जात आहे.

आरक्षण सोडत आणि प्रत्यक्ष निवडणुकीचे वेळापत्रक घोषित होऊन निवडणुकीची रणधुमाळी सुरू होईल.

या निवडणुकीसाठी महायुतीसह महाविकास आघाडीतील घटक पक्ष तसेच, इतर पक्ष सरसावले आहेत. प्रभागनिहाय बैठकांसह, बूथ कमिटी तसेच, आमदारांच्या बैठकांचे सत्र सुरू आहे. शहरात भाजपाचे चार तर, राष्ट्रवादी काँग्रेसचा एक आमदार आहे.

शिवसेनेचा (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रत्येकी एक खासदार आहे. प्रदेशाध्यक्ष तसेच, वरिष्ठ नेते व शहर प्रभारींकडून पिंपरी-चिंचवड शहरासह माजी नगरसेवकांसह इच्छुकांचा आढावा घेतला आहे. वेगवेगळ्या पातळीवर प्रभागनिहाय सर्वेक्षणही केले जात आहे.

सत्तेतील भाजप महापालिकेची सत्ता पुन्हा मिळविण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करीत आहे. नवनियुक्त शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्यासह चारही आमदार तयारीला लागले आहे. बैठकांचा धडका लावला आहे. या प्रमुखांकडे प्रभागांच्या जबाबदारीची विभागणी केल्याचे सूत्रांनी सांगितले.

तर, महायुतीतीलच अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस फेब्रुवारी 2017 मध्ये निसटलेली महापालिका पुन्हा ताब्यात घेण्यासाठी एकवटली असल्याचा दावा केला जात आहे.

### दोन्ही मित्रपक्ष स्वतंत्र लढणार ?

» महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्रपणे लढणार असल्याचे सध्याचे चित्र आहे. त्यादृष्टीने दोन्ही पक्ष जोरदार तयारी करीत आहेत. सक्षम उमेदारांची संख्या अधिक असल्याचा दावा दोन्ही पक्षाकडून केला जात आहे. पक्षश्रेष्ठींनीही स्वतंत्र लढण्यास हिरवा कंदिल दिल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यामुळे भाजपा व राष्ट्रवादी आमनेसामने येणार आहेत. तसेच, शिवसेनेनेही (एकनाथ शिंदे) एकला चलो रे...च्या नारा दिला आहे.

# ऑनलाइन दर्शन पासला नेटवर्कचा खोडा

## ऑनलाइन पासला नेटवर्कचा खोडा असल्याने ऑनलाइन पास सुविधा सुरू करणे अवघड असल्याचे दिसून येते

**पुणे | प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकभक्तांना ऑनलाइन पास (क्यूआर कोड) सुविधा देण्याचा विचार देवस्थानकडून सुरू आहे. मात्र, ऑनलाइन पासला नेटवर्कचा खोडा असल्याने ऑनलाइन पास सुविधा सुरू करणे अवघड असल्याचे दिसून येते.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे भाविकभक्त, पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. श्रावण महिन्यात या ठिकाणी दररोज लाखो भाविक पर्यटन, दर्शनासाठी येत असतात.

या ठिकाणी अनेकदा भाविकांकडून परस्पर पैसे घेऊन त्यांना दर्शन दिले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिरात दर्शन घेण्यासाठी मंदिर समितीच्या वतीने ऑनलाइन पासची सुविधा देण्याचा विचार करीत आहेत. मात्र, हा पास देताना नेटवर्कचा मोठा अडथळा निर्माण होत आहे.

नेटवर्क मिळाल्यास ऑनलाइन पद्धतीने पास तत्काळ मिळेल. येणाऱ्या भाविकभक्तांना दर्शन घेताना अडचणी येणार नाहीत तसेच मंदिर व्यवस्थापन समितीच्या उत्पन्नात देखील वाढ होईल. त्यामुळे संबंधित कंपन्यांनी त्यांचे नेटवर्क सुधारावे, अशी मागणी भाजप किसान मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष संजय थोरात, भीमाशंकर देवस्थानचे अध्यक्ष सुरेश कौदरे आणि भाविकभक्त, मंदिर प्रशासनाकडून होत आहे.



### येथील नेटवर्क सुधारा

» 24 तास नेटवर्क मिळाल्यास ऑनलाइन पद्धतीने पास तत्काळ मिळेल. येणाऱ्या भाविकभक्तांना दर्शन घेताना अडचणी येणार नाहीत तसेच मंदिर व्यवस्थापन समितीच्या उत्पन्नात देखील वाढ होईल. त्यामुळे संबंधित कंपन्यांनी त्यांचे नेटवर्क सुधारावे, अशी मागणी भाजप किसान मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष संजय थोरात, भीमाशंकर देवस्थानचे अध्यक्ष सुरेश कौदरे आणि भाविकभक्त, मंदिर प्रशासनाकडून होत आहे.

> भीमाशंकर परिसरात नेटवर्कसेवा देत असलेल्या संबंधित टॉवर कंपनीने सुरळीत नेटवर्क दिल्यास ऑनलाइन दर्शन सुविधा उपलब्ध होईल. त्यामुळे सद्यःस्थितीत 4 ते 5 तास दर्शनासाठी भाविकांना रांगेत थांबावे लागणार नाही.
>
> \- रमेशशेठ येवले, अध्यक्ष संस्थापक, रमेशभाऊ येवले प्रतिष्ठान, गंगापूर

> भाविकांना दर्शन सुलभ व्हावे, यासाठी ऑनलाइन पद्धतीने दर्शन करण्यासाठी देवस्थान प्रयत्नशील आहे. येथे लवकरच ऑनलाइन दर्शन सुविधा भाविकांना उपलब्ध केली जाईल. केवळ पावसामुळे मोबाईल टॉवरच्या नेटवर्कचा प्रॉब्लेम येण्याची शक्यता आहे. भाविकांना ऑनलाइन पासद्वारे दर्शन देण्यासाठी कार्यवाही केली जाईल.
>
> \- सुरेश कौदरे, अध्यक्ष, भीमाशंकर देवस्थान

या ठिकाणी बीएसएनएल, एअरटेल, आयडिया, जिओ कंपनीचे टॉवरद्वारे नेटवर्क आहे. परंतु, सततच्या पावसामुळे या ठिकाणी वारंवार वीजप्रवाह खंडित झाल्यानंतर नेटवर्क अनेक दिवस बंद राहत आहे. संबंधित टॉवर कंपनीने त्याच्या नेटवर्कमध्ये सुधारणा करावी तसेच टॉवरच्या ठिकाणी इन्व्हर्टरची सुविधा, 24 तास ऑपरेटर नेमणे गरजेचे आहे; जेणेकरून येणाऱ्या भाविकांना ऑनलाइन पास तत्काळ मिळेल व त्यांचे दर्शन सुलभ होईल, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकभक्तांना ऑनलाइन पास (क्यूआर कोड) सुविधा देण्याचा विचार देवस्थानकडून सुरू आहे. ऑनलाइन पासला नेटवर्कचा खोडा असल्याने ऑनलाइन पास सुविधा सुरू करणे अवघड असल्याचे दिसून येते.

# तळेगावपासून दोन प्रस्तावित रेल्वेमार्गांची आखणी

## पुणे-अहिल्यानगर आणि मिरज मार्गाला जोडणारा असे हे दोन मार्ग असून, त्यासाठीचे भूसंपादन लवकरच केले जाणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

**पुणे | प्रतिनिधी**

तळेगावपासून सुरू होणाऱ्या रेल्वेच्या दोन प्रस्तावित मार्गांमुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. तळेगावपासून सुरू होणाऱ्या पुणे-अहिल्यानगर आणि मिरज मार्गाला जोडणारा असे हे दोन मार्ग असून, त्यासाठीचे भूसंपादन लवकरच केले जाणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी (दि. 25) दिली.

रेल्वे मंत्रालयाने प्रस्तावित केलेल्या पुणे ते अहिल्यानगर या रेल्वेमार्गासंदर्भातील बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, पुणे परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी दोन नवीन रेल्वेमार्गांची आखणी करण्यात येत आहे. तसेच, राज्य सरकारकडून पुण्यासाठी दोन रिंगरोड तयार करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे ताथवडे येथून सातारा रस्त्याला जोडणारा नवा रुंद मार्ग तयार करण्यात येत आहे.

या रस्त्यातील भुयारी मार्गदेखील रुंद केले जाणार आहेत. चिंचवड येथील पादचारी पूल काढून नव्याने 40 कोटी रुपये खर्च करून नवीन पूल तयार करण्यात येणार आहे. बंगरूळु महामार्गावरील मुकाई चौक ते मुळा नदी वाकडपर्यंत 24 मीटर रुंदीचा सिमेंट रस्ता तयार करण्यात येणार आहे. पावसाळ्यानंतर या कामालादेखील सुरुवात होणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी बऱ्यापैकी कमी होईल, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.



रेल्वे मंत्रालयाने मिरज मार्गाला जोडणारा नवीन मार्गदेखील प्रस्तावित केला आहे. त्याचे काम पुढील पाच वर्षांत करण्यात येणार आहे. त्यासंदर्भातील भूसंपादनही लवकरच सुरू करण्यात येईल. या कामामुळे पुणे परिसरातील वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होणार आहे, असेही पवार यांनी सांगितले

### पुणे ते अहिल्यानगर रेल्वेमार्ग

» रेल्वेमार्ग करताना तळेगावपासून चाकण, आळंदी, वाघोली, शिक्रापूर, रांजणगाव, सुपे, चास व अहिल्यानगर असा केला जाणार आहे. यात एकूण आठ स्टेशन असतील. यामुळे चाकण, शिक्रापूर, रांजणगाव तसेच अहिल्यानगर या औद्योगिक पट्ट्यांना रेल्वेचा फायदा होणार आहे. त्यासाठी तळेगाव ते उरुळी कांचन हा 75 किलोमीटरचा मार्ग नव्याने करण्यात येणार आहे. हा मार्ग सोलापूर मार्गाला जोडण्यात येणार आहे.

### उरुळी कांचनमध्ये मेगा टर्मिनल

»तळेगाव ते उरुळी कांचन या 75 किलोमीटरच्या मार्गासाठी उरुळी कांचन येथे शंभर हेक्टरवर मेगा टर्मिनल उभारण्यात येत आहे. यासंदर्भात रेल्वे विभागाने दिलेल्या आराखड्यानुसार लवकरच भूसंपादनाला सुरुवात होणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. हा रेल्वेमार्ग पुढील चार वर्षांत पूर्ण करण्यात येणार असून, भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.